# साधकांचे मासिक प्रेरणा पत्र
# विपस्सना
## साधक (मराठी)

**बुद्धवर्ष 2568, आश्विन पौर्णिमा, 17 ऑक्टोबर, 2024 वर्ष 8 अंक 7**

**वार्षिक शुल्क** रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


### धम्मवाणी

**धम्मं चरे सुचरितं, न नं दुच्चरितं चरे।**
**धम्मचारी सुखं सेति, अस्मिं लोके परम्हि च॥**

*– धम्मपद 169, लोकवग्गो*

सुचरित धर्माचे आचरण करावे, दुराचरणापासून वाचावे. धर्मचारी या लोकात आणि परलोकात (दोन्ही ठिकाणी) सुखपूर्वक विहार करतो.

## उत्तराधिकारी कोण?

कोणा पित्याच्या एक किंवा अधिक संतती असतील तेव्हा ते सर्व त्याचे उत्तराधिकारी असतात. त्याच्या धन-दौलतीचे, संपत्तीचे मालक असतात. ते तिला वाढवतात किंवा गमावतात.

पण धर्माच्या क्षेत्रात असे कदापि होऊ शकत नाही. भगवान बुद्धांकडून ज्यांनी विपश्यना शिकली आणि पसरवली ते सर्व त्यांचे उत्तराधिकारी बनले. त्या उत्तराधिकारी शिक्षकांनी इतरांना विपश्यना शिकवून, त्यांना प्रवीण करवून आपले उत्तराधिकारी बनवले. अशा प्रकारे पिढ्यानुपिढ्या गुरु-शिष्य परंपरेच्या आधारावर या सर्व उत्तराधिकाऱ्यांनी धर्म शिकवला. सम्राट अशोकाच्या वेळी भिक्षू सोण आणि उत्तर झाले. ते भगवानांचा धर्म शिकून त्यांचे उत्तराधिकारी बनले आणि याच रुपात धर्म शिकवण्यासाठी म्यमाला गेले. तिथे सामान्य लोकांना धर्म शिकवण्याबरोबरच त्यांनी काही असे शिष्य तयार केले ज्यांनी भगवानांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या रुपात या गुरु-शिष्य परंपरेला कायम ठेवले.

भगवान बुद्धांनी कधीही आपल्या पुत्राला राहुलला आपला उत्तराधिकारी बनवले नाही. पुढे जाऊन गुरु नानकदेवांनी आपला शिष्य अंगद देव याला आपला उत्तराधिकारी बनवले ना की आपल्या मुलाला. धर्माच्या क्षेत्रात उत्तराधिकारी तोच असतो जो आपल्या गुरुकडून धर्म शिकविण्याची विद्या प्राप्त करून तिला शिकवू लागतो. ही गुरु-शिष्य परंपरा मागच्या अडीच हजार वर्षापासून चालत आली आहे आणि पुढेही चालत राहील.

गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांच्याकडून मी विपश्यना साधना म्हणजे शुद्ध धर्म शिकलो आणि त्यांच्या उत्कट अभिलाषेला पूर्ण करण्यासाठी भारतात येऊन लोकांना शिकवू लागलो. रंगूनमध्ये राहत असताना १४ वर्षांपर्यंत मी त्यांच्या संपर्कात राहिलो आणि पाहिले की न जाणे कितीतरी वेळा त्यांनी या शब्दांचा पुनरुच्चार केला असेल की, "भारताकडून आपल्याला विपश्यनेच्या रुपात अनमोल रत्न मिळाले परंतु आज भारत या रत्नाला गमावून कंगाल झाला आहे. याला पुन्हा भारतात नेऊन आपल्याला भारताचे ऋण चुकवायचे आहे. हे ऋण आणखी कोण चुकवेल भले! मीच चुकवेल." त्यांनाच भारतात येऊन हे अनमोल ऋण चुकवायचे होते.

ते स्वत: भारतात येऊन इथे विपश्यनेचे पुनर्जागरण करू इच्छित होते, परंतु त्या दिवसात बर्मी नागरिकांना फक्त दोनच कारणांसाठी पासपोर्ट दिला जात होता – एकतर त्यांनी कायमचे बर्मा सोडून जावे किंवा त्यांना बाहेर कुठेतरी नोकरी मिळत असेल तर. सयाजी ऊ बा खिन यांना ना कायमचे बर्मा सोडायचे होते आणि ना त्यांना भारतात येण्यासाठी खोट्या नोकरीचा आधार घ्यायचा होता. त्यामुळे सरकारने त्यांना पासपोर्ट दिला नाही आणि ते भारतात येऊ शकले नाहीत. परंतु सौभाग्याने एका अत्यंत विशिष्ट कारणामुळे मला बर्माचा पासपोर्ट मिळाला. माझी आई मुंबईमध्ये मानसिक स्तरावर अस्वस्थ झाली होती आणि मला हे माहित होते की तिने जर विपश्यना केली तर ती ठीक होईल. बर्मी कॅबिनेटमध्ये माझे दोन घनिष्ट मित्र होते. त्यांनी माझे जोरदार समर्थन केले आणि या विशेष कारणामुळे मला पासपोर्ट मिळाला.

गुरुदेव या घटनेने अत्यंत प्रसन्न झाले. ते म्हणाले की मी स्वत: तर भारताचे ऋण चुकवू शकत नाही परंतु आता हे काम माझ्या वतीने तुम्हाला करावे लागेल. त्यांच्याकडून विपश्यना विद्येत पारंगत होऊन मी भारतात आलो आणि गुरुदेवांच्या या उद्देश-पूर्तीसाठी स्वत:ला झोकून दिले. तेव्हा धर्माच्या क्षेत्रात गुरु-शिष्य परंपरेनुसार मी गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांचा उत्तराधिकारी बनलो. मी भारतात येऊन अनेकांना विपश्यनेचे प्रशिक्षण दिले आणि काही जणांना आचार्य पदावर नियुक्त केले. जे आचार्यपदी स्थानापन्न झाले ते विपश्यना शिकवत माझे उत्तराधिकारी बनले. अशा प्रकारे गुरुदेवांच्या स्वप्नांना साकार होताना पाहून माझ्या मनावरचे ओझे हलके झाले. बर्मावर भारताचे जे ऋण होते ते चुकविण्याचे काम सुरु झाले.

पुढे जाऊन विपश्यनेची अनेक केंद्रे बनली आणि हळूहळू भारतातच नाही तर विश्वातील अनेक देशांमध्ये केंद्रे बनत गेली. जिथे-जिथे ही केंद्रे स्थापन झाली तिथे-तिथे त्या सर्व केंद्रांमध्ये प्रशिक्षण देणारे आचार्य माझे उत्तराधिकारीच आहेत. कारण मी त्यांना जी विपश्यना शिकवली आहे तिला पसरविण्याचेच काम ते करीत आहेत.

जेव्हा दूर-दूरपर्यंत, ठिक-ठिकाणी विपश्यनेची अनेक केंद्रे बनली आणि बनतच चालली आहेत तेव्हा मी एक निश्चय केला की प्रत्येक स्थानीय केंद्रावर प्रशिक्षकाच्या रुपात एक-एक वेगवेगळा उत्तराधिकारी असेल, परंतु जिथे कुठे आवश्यक असेल तिथे सल्ला, मार्गदर्शन देण्यासाठी अनेक प्रादेशिक आचार्यही नियुक्त असतील. जिथे अनेक प्रादेशिक आचार्य काम करीत असतील तिथे आवश्यकता असल्यास एक-एका मोठ्या क्षेत्रासाठी एक भौगोलिक आचार्य असेल. केंद्रीय आचार्य, प्रादेशिक आचार्य तसेच

भौगोलिक आचार्यांची नियुक्ती झाल्यावर ते सर्व माझे उत्तराधिकारी मानले जातील. त्यांची नावे मी लवकरच प्रकाशित करेन.

एखाद्या केंद्राचा अथवा इतर प्रादेशिक किंवा भौगोलिक क्षेत्राचा उत्तराधिकारी बनण्याचा अर्थ असा नाही की तो त्या-त्या केंद्राचा किंवा क्षेत्राचा मालक झाला. सर्व आचार्य केवळ प्रशिक्षण-क्षेत्राचेच उत्तराधिकारी आहेत.

त्याचप्रमाणे केंद्रांचे संचालन करणाऱ्या ट्रस्टींचाही कोणता उत्तराधिकार नसतो तसेच कुठल्या केंद्रात कोणता मान-सन्मान किंवा पद-प्रतिष्ठा मिळविण्याचा अधिकार नसतो. ते सर्व धर्मसेवक आहेत आणि केंद्राची यथावश्यक सेवा करत असतात. ज्या कोणा व्यक्तीने धर्मस्थळासाठी जमीन दान दिली अथवा कोणी त्यावर इमारत बांधून दिली तर त्या जमिनीवर किंवा त्या बनवून दिलेल्या इमारतीवर त्यांचा कोणताही मालकी हक्क नसतो. हक्क फक्त धर्माचाच असतो, दानींचा नाही. त्यांना आपापल्या दानाचा आणि सेवेचा अमूल्य पुण्यलाभ प्राप्त होतो, बस्स ! इतकेच.

उदाहरणस्वरूपाने भगवान बुद्धांच्या वेळी अनाथपिंडकने सोन्याची नाणी अंथरून भगवानांना भूमीचे दान दिले. त्या भूमीवर पुष्कळसे धन खर्च करून निवासस्थानांच्या आवश्यकतांचीही पूर्तता केली. इतके झाल्यावरही अनाथपिंडक धर्माच्या परंपरेला खूप चांगले जाणत होता की दान दिलेल्या भूमीवर आणि त्या भूमीवर बनवलेल्या इमारतीवर त्याचा तीळमात्रही अधिकार नाही. जे दान दिले ते दिले. बदल्यात काही प्राप्त करण्याची भावना अत्यंत दोषपूर्ण आहे. त्याने पाहिले की वर्षावासानंतर जेव्हा भगवान आपल्या भिक्षूंसहित इतर प्रदेशांमध्ये विहार करण्यासाठी जातात तेव्हा हा विहार खूप सुना पडतो. इथे नेहमी जी वर्दळ असायची ती भगवानांच्या प्रवासादरम्यान कमी व्हायची. त्याची खूप इच्छा होती की भगवानांच्या अनुपस्थितीतही इथे लोकांची वर्दळ सतत राहावी. याकरीता त्या भूमीवर तो भगवानांचे एक मंदिरासारखे स्थान बनवू इच्छित होता परंतु खूप इच्छा असतानाही तो असे करू शकला नाही. कारण जी भूमी दान दिली होती त्यावर त्याचा कोणताही अधिकार नव्हता. तेव्हा आपली इच्छा पूर्ण व्हावी म्हणून तो भगवानांकडे प्रार्थना करण्यासाठी गेला की तिथे एक मंदिर बनविण्याची अनुमती मिळावी. जर दान दिलेल्या भूमीवर त्याचा हक्क असता तर त्याला भगवानांकडून अनुमती घेण्याची काय आवश्यकता होती? भगवानांनी अनुमती दिली नाही कारण धर्माचे स्थान पूजे-अर्चेसाठी आणि गर्दी-गोंधळाचे व्हावे अशी त्यांची इच्छा नव्हती. ते तर ध्यान करण्यासाठी असते. तेव्हा भगवानांनी बोधिवृक्षाची फांदी मागवून तिथे लावून घेतली आणि म्हटले की 'हा वृक्ष वाढल्यावर त्याच्याखाली बसून लोक ध्यान करतील. अशा प्रकारे या भूमीचा लोकांना खरा लाभ मिळेल.'

अशा प्रकारे आजही भूमीचे किंवा त्यावर केंद्र बनविण्याचे दान देणारा व्यक्ती या प्राचीन परंपरेला खूप चांगले समजून घेईल की दिलेल्या दानावर त्याचा किंचितही अधिकार असू शकत नाही. धर्माची ही शुद्ध परंपरा कायम राहील तेव्हाच धर्माची खरी अभिवृद्धी होत राहील. इथे सदैवं पिढ्यानुपिढ्या धर्माचेच प्रशिक्षण दिले जात राहील. केंद्रांचे आचार्य वेळोवेळी बदलत राहतील पण धर्म-प्रशिक्षणाचे कार्य सतत चालू राहील.

विपश्यनेच्या अनेक केंद्रांची स्थापना झाल्यावर माझ्या मनात काही इतर महत्वपूर्ण विचार आले ज्यांचा विपश्यनेच्या प्रशिक्षणाशी काही संबंध नव्हता. एक महत्वपूर्ण विचार तर हा आला की भगवान बुद्धांची पावन विद्या भारतातून कशी पूर्णपणे लुप्त झाली? याचे अनुसंधान व्हावे आणि भारतात तसेच विश्वात आता पुन्हा जागृत झालेल्या या विद्येची समग्र प्रशिक्षण सामग्री सहस्त्रावधी वर्षांपर्यंत सुरक्षित राहावी. त्याचबरोबर भगवानांच्या शिकवणीचे प्रमुख साहित्य 'त्रिपिटक' म्हणजे याचा परियत्ती-पक्ष (therotical aspect) जो भारतातून लुप्त झाला होता तोही पुनर्प्रकाशित व्हावा. यासाठी 'विपश्यना विशोधन विन्यास' या नावाने एका शोध-संस्थानाची निर्मिती व्हावी. येणाऱ्या युगांमध्ये बुद्धांच्या शिकवणीच्या पुनर्जागरणाशी सबंधित सारे साहित्य या संस्थेत केवळ सुरक्षितच नाही तर आज आणि इथून पुढे सहस्त्रावधी वर्षांपर्यंत याचा उपयोग आणि याचे अनुसंधान होत रहावे. या विशोधनाकरीता शोध करणारे भिन्न-भिन्न मर्मज्ञ वेळोवेळी सेवा देत राहतील. याचा अर्थ या विशोधन कार्यात गुरु-शिष्य परंपरा अजिबात राहणार नाही. यासाठी जेव्हा याचे ट्रस्ट-डीड बनेल तेव्हा या विशोधन संस्थेसाठी माझ्याकडून एक योग्य उत्तराधिकारी बनविण्याचा प्रस्ताव ठेवला जावा.

माझ्या मनात दुसरा विचार हा आला की भगवान बुद्धांच्या पावन धातुंचा योग्य सन्मान तेव्हाच होईल जेव्हा ते भगवानांच्या मार्गदर्शनानुसार एखाद्या भव्य स्तूपात प्रतिष्ठापित करण्यात येतील. हा भव्य स्तूपही ब्रह्मदेशाच्या स्थापत्यकलेच्या आधारावरच बनेल. हे अशासाठी की ब्रह्मदेशाने सम्राट अशोकाकडून प्राप्त झालेल्या परियत्तीला म्हणजे बुद्धवाणीला तसेच पटिपत्तीला म्हणजे विपश्यनेला गुरु-शिष्य परंपरेने पिढ्यानुपिढ्या दोन हजार वर्षांपर्यंत शुद्ध स्वरुपात कायम ठेवले म्हणूनच तर या दोन्ही आपल्याला प्राप्त झाल्या. जसे बर्माच्या लोकांनी भारताचे उपकार मानले कारण इथूनच त्यांना शुद्ध धर्म प्राप्त झाला, त्याचबरोबर सम्राट अशोकाचेही उपकार मानले ज्याच्या प्रयत्नांमुळे त्यांना धर्म प्राप्त झाला. याच प्रकारे आज भारताच्या लोकांनीही बर्माचे उपकार मानावेत आणि त्याचबरोबर सयाजी ऊ बा खिन यांचेही उपकार मानले पाहिजेत की ज्यांनी बर्माचे ऋण चुकविण्यासाठी मला पूर्णपणे प्रशिक्षित करून भारतात पाठविले. या दोन्ही उपकारांच्या पावन स्मृती दीर्घकाळपर्यंत टिकून राहाव्यात या निमित्ताने माझ्या मनात एका भव्य स्तूपाच्या – विश्व विपश्यना पगोडा च्या निर्मितीची योजना जागली. हा विश्वभरातील बुद्धानुयायींना, विशेषकरून विपश्यी साधकांना आव्हान करण्यासाठी एक आकर्षक प्रकाश-स्तंभ ठरेल. यासाठी 'ग्लोबल विपश्यना फाउंडेशन' ची स्थापना करण्यात येईल आणि याकडे लक्ष देण्यात येईल की या पगोडाची रचना बर्मी स्थापत्य आणि वास्तुकलेनुसार केली जावी जेणेकरून आजच नाही तर भविष्यातही लोकांना बर्माच्या तसेच सयाजी ऊ बा खिन यांच्या उपकारांचे सदैवं स्मरण होत राहील.

माझ्या या कल्पनेनुसार पगोडाचे निर्माणकार्य झाले ज्यात भारत तसेच शेजारच्या देशांमधील विपश्यी साधकांनी तसेच इतर अन्य बुद्धभक्तांनी श्रद्धापूर्वक दान दिले. कोणीही या विचाराने दान दिले नाही की मी या पगोडाचा ट्रस्टी बनेल किंवा याचा अध्यक्ष होईल किंवा गुरुजींच्या नंतर याचा मालक होईल. या दानींमधून मला एका सर्वश्रेष्ठ दानाची नेहमी आठवण येत असते ज्याने माझे डोळे ओलावले होते. पगोडाच्या उद्घाटन सोहळ्यात त्याच्या मुख्य कक्षात (डोमात) दानासाठी एक छोटासा कलश ठेवला होता. मी पाहिले की भाजी-पाला डोक्यावर घेऊन घरोघरी विकून त्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायी महिलेने जेव्हा पाहिले की भगवान बुद्धांच्या नावावर इतका विशाल पगोडा बनत आहे तेव्हा तिने आपल्या साडीच्या पदरात बांधलेली काही नाणी काढून श्रद्धापूर्वक त्या दान-पात्रात टाकली ज्यांच्या खळखळ झालेल्या आवाजाने मला भावनावश केले. त्या गरीब महिलेचे दान किती सात्विक आणि मौल्यवान होते ! करोडोंचे दान देणाऱ्यांच्या तुलनेत अधिक सुफलदायी होते. काही अशा दान देणाऱ्यांप्रमाणे ती कसा विचार करू शकेल की मी कधी या पगोडाची ट्रस्टी किंवा अध्यक्ष बनेन किंवा पुढे जाऊन याची मालकीण बनेन? कोणत्याही लाभाच्या अपेक्षेविना दिले गेलेले त्या गरीब महिलेचे हे शुद्ध दान खरोखरच इतिहासात स्मरण करण्यायोग्य राहील. कोणत्याही अपेक्षेविना दिलेले दान हेच खरे दान आहे, नाही तर तो व्यवसाय आहे.

या पगोडा परिसरात भगवान बुद्धांच्या जीवनकाळाची एक चित्र-प्रदर्शनी बनली आहे जी बनविण्यासाठी बर्माचे प्रमुख कलाकार बोलावण्यात आले होते. असे झाल्यानंतर चित्रकलेला, वास्तुकलेला आणि पगोड्याच्या भव्य विशेषतेला कायम ठेवण्यासाठी जे ट्रस्ट-डीड बनले

त्यात माझ्याद्वारे उत्तराधिकारी नियुक्त करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. या उत्तराधिकाराचा एक व्यक्ती विशेषरूपाने बर्मी कला तसेच बर्मी स्थापत्यकलेच्या देखरेखीसाठी जबाबदार असेल आणि दुसरे चार विपश्यनेचे आचार्य असतील की जे या विशाल ध्यानकक्षात आणि पगोडा-परिसरात कुठे काही धर्माविरुद्ध कार्य घडू नये याची काळजी घेतील. त्यामुळे या ट्रस्टमध्ये एकाच्या जागी पाच उत्तराधिकारी नियुक्त करून मी ट्रस्टच्या मूळ उद्देशाला आवश्यकतेनुसार निभावले.

तिसरी आवश्यकता ही जाणवली की या पगोडाच्या डागडुजीकरीता, अद्वितीय स्मृती-चिन्हाच्या आणि बर्मी वास्तुकलेच्या दुरुस्तीकरीता आवश्यक धनाच्या पूर्तीसाठी 'सम्यक वाणिज्य चैरिटेबल ट्रस्ट' ची स्थापना केली जावी. इथेही गुरु-शिष्य परंपरेचा नियम नसल्यामुळे माझ्याद्वारे एक उत्तराधिकारी नियुक्त करण्याचा प्रस्ताव ठेवला गेला. म्हणजे विपश्यनेच्या प्रशिक्षण केंद्रांहून वेगळे, केवळ या तीन वरील प्रतिष्ठानांमध्येच माझ्याद्वारे उत्तराधिकारी नियुक्त करण्याचा प्रस्ताव आहे.

या तीनही संस्था माझ्या स्वत:च्या स्वप्नांची परिणिती आहे. या तीनही संस्थांची स्थापना वेगवेगळ्या उद्देश्यांकरीता झाली आहे. या तीनही संस्थांना माझ्यानंतरही चिर-काळापर्यंत टिकवून ठेवणे मी आवश्यक समजतो. याकरीता या तिन्हींमध्ये उत्तराधिकारी नियुक्त करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. तेव्हा यामध्ये आता जे उत्तराधिकारी नियुक्त केले जातील ते आपल्यानंतर इतर योग्य व्यक्तींना आपापल्या जबाबदारीच्या कार्यांना करत राहण्यासाठी पुढे नियुक्त करतील ज्यामुळे ही तीनही कार्ये पिढ्यानुपिढ्या सुव्यवस्थितपणे चालत राहतील.

जिथपर्यंत गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांच्याद्वारे भारताचे ऋण चुकविण्याचा प्रश्न होता त्यासाठी विपश्यना केंद्रांची बांधणी अशा प्रकारे झाली ज्यात प्राचीन काळापासून चालत आलेल्या गुरु-शिष्य परंपरेलाच आधार बनवला गेला आहे. कारण जो लोकांना धर्म शिकवतो आणि त्यांच्यात धर्म जागवतो तोच विपश्यनेच्या प्रशिक्षण केंद्राचा उत्तराधिकारी असतो. इथे जे कोणी आचार्य आज सुनिश्चित आहेत किंवा भविष्यात होतील ते सर्व उत्तराधिकाऱ्यांचेच कार्य करतील. याच कारणामुळे विपश्यना केंद्रांच्या संस्थांमध्ये कोणा प्रशिक्षित आचार्याला सोडून अन्य कोणाला उत्तराधिकारी बनवले जाऊ शकत नाही. कारण जितकीही विपश्यना केंद्रे आहेत त्या सर्वांसाठी तर प्रशिक्षक आचार्य उत्तराधिकारी असतीलच, त्यांच्यानंतरही जे जे आचार्य होतील ते सर्व गुरु-शिष्य परंपरेच्या आधारावर उत्तराधिकारीच असतील. या कारणासाठीच यांच्या ट्रस्ट-डीडमध्ये माझ्याद्वारे कोणा उत्तराधिकाऱ्याच्या नियुक्तीचे वर्णन आवश्यक मानले गेले नाही. परंतु वरील तीन संस्थाने की जी विपश्यनेच्या प्रशिक्षणाकरीता नाहीत त्यांच्यात माझ्याद्वारे विशेषरूपाने उत्तराधिकारी नियुक्त करण्याचा प्रस्ताव अवश्य ठेवला गेला.

ही गोष्ट पुन्हा एकदा सांगत आहे आणि सर्वांनी ती खूप चांगली समजून घेतली पाहिजे की धर्माच्या क्षेत्रात कोणाचाही मालकी हक्क नसतो – ना उत्तराधिकाऱ्यांचा, ना ट्रस्टींचा, ना दान-दात्यांचा, ना शासनाधिकाऱ्यांचा. सर्वांना केवळ आपापल्या हिश्श्याचे काम करण्याचा अधिकार आहे. धर्माचे सारे कार्य खूप शांततेने चालले पाहिजे. कोणाच्या मनात काही मिथ्या संदेह किंवा भ्रांती असतील तर मला भेटून त्या दूर कराव्यात. मंगल भावनांसहित धर्माचे कार्य चालत राहावे यातच सर्वांचे कल्याण आहे.

कल्याणमित्र, सत्यनारायण गोयंका

*– वर्ष 1, बुद्धवर्ष 2556, जेष्ठ पौर्णिमा, दि. 04-06-2012,अंक 3 मराठी पत्रिके मधून साभार*

------0------

(पूज्य गुरुदेवांच्या अकराव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने जून २०१२ मध्ये प्रकाशित झालेला त्यांचा हा लेख त्यांच्याविषयी श्रद्धांजली म्हणून पुनर्प्रकाशित करीत आहोत. धर्म मार्गावर सतत पुढे जाण्यासाठी त्यांच्याद्वारे बनवले गेलेले नियम, उपनियम व निर्देशांना इमानदारी पूर्वक योग्य प्रकारे पालन करणे आमचे कर्तव्य आहे. तेव्हा आम्ही खऱ्या अर्थाने त्यांचे उत्तराधिकारी बनू आणि आपले अमुल्य मानवी जीवन सफल करु शकू.

या धर्मपथावर चालून आपल्या जून्या भव संस्कारांतून मुक्ति मिळवू या! सर्व निर्वाणदर्शी होवोत!! सर्वांचे मंगल होवो!!! सं.)

------0------

**मुंबई आणि जवळपास परिसरातील विपश्यनेच्या गतिविधि**

*लिंकः https://mumbai.vridhamma.org/*

------0------

## ऑनलाइन भावी शिबिर कार्यक्रम व आवेदन

सर्व भावी शिबिरांची माहिती नेटवर खालील लिंक्स वर उपलब्ध आहे. सर्व प्रकारचे बुकिंग केवळ ऑनलाईन होत आहे. म्हणून आपल्याला निवेदन आहे की खालील लिंक वर चेक करा आणि आपल्याला उपयुक्त शिबिरासाठी अथवा सेवेसाठी सरळ ऑनलाईनच आवेदन करावे. https://www.dhamma.org/en/schedules/schgiri

विश्वभरातील सर्व भावी शिबिरांची माहिती व आवेदनासाठी:

***https://schedule.vridhamma.org* व *www.dhamma.org***

अन्यथा ***https://www.dhamma.org/en-US/locations/directory#IN***

-----0-----

**अति महत्वपूर्ण सूचना**

1. सेंट्रल आईवीआर (इंटरैक्टिव्ह वॉयस रिस्पॉन्स) संभाषण नंबर- ०२२-५०५०५०५१ अर्जदार या नंबरवर आपल्या नोंदवलेल्या मोबाईल नंबर (फॉर्म मधील उल्लेखित नंबर) ने आपली शिबिर नोंदणीची स्थिति तपासण्यासाठी, रद्द करण्यासाठी, स्थानांतरीत करण्यासाठी अथवा कुठल्याही सेंटरवर नोंदणी केलेल्या आपल्या अर्जाची पुष्टी करण्यासाठी कॉल करू शकतात. ते या सिस्टीमद्वारे केंद्राशी सुद्धा संपर्क करू शकतात. हा भारताच्या सगळ्या विपश्यना केंद्रांसाठी एक केंद्रीय संपर्क नंबर आहे.

2. जर अकेंद्रीय (नॉन-सेंटर) भावी शिबिरांचे कार्यक्रम पत्रिकेत प्रकाशन करण्यासाठी पाठवू इच्छिता, तर कृपया त्यांनी आपल्या समन्वयक क्षेत्रिय आचार्य (सीएटी) यांच्या सहमती पत्राबरोबर पाठवावे, जेव्हा की स्थापित केंद्राचे कार्यक्रम केंद्रीय आचार्य (सीटी) यांच्या सहमती पत्राबरोबर आले पाहिजेत. याशिवाय आम्ही कोणतेही कार्यक्रम पत्रिकेत प्रकाशित करू शकत नाही.

-----0-----

**नवे उत्तरदायित्व**

**आचार्य**

1. श्री विनोदकुमार वतनी, औरंगाबाद
2. श्री केशवलाल पटेल, नवसारी, व दक्षिण गुजरात, क्षेत्रासाठी समन्वयक क्षेत्रीय आचार्यांच्या रूपाने सेवा

**वरिष्ठ स. आचार्य**

1. श्री बाबू कांबळे, नाशिक, महा.

**नव नियुक्त**

**सहायक आचार्य**

1. श्री. रमाकांत बरनवाल, लखनऊ
2. कु. सम्पूर्ण जी. एल. चेन्नई, तमिलनाडु
3. कु. महालक्ष्मी महा, चेन्नई, तमिलनाडु
4. Mr. Pempa Tshering Bhutia, Gangtok, Sikkim
5. Mr. Kyaw Mya, Myanmar
6. Mrs. Than Than Nwe, Myanmar
7. Mr. Mahn Mg, Myanmar
8. Mr. Zaw Tun, Myanmar
9. Mr. Chi-Hsin Hsiao, China (Taiwan)
10. Mrs. Yan Chun Yang, China

**बालशिबिर शिक्षक**

1. डॉ. निशा गवांडे गांधीधाम, कच्छ
2. श्री मुकेश दवे, भुज-कच्छ
3. श्रीमती भारती गजेन्द्र वैद्य, भुज-कच्छ
4. श्री लोगनाथन एस, चेन्नई,
5. श्रीमती मरियम, कोयंबटूर
6. श्री राजेश आर, तिरुवन्नामलाई
7. श्री गोपी के, तिरुवन्नामलाई
8. श्रीमती एम. जयरानी, अंबत्तूर
9. श्री सतीश कुमार, पटना
10. श्री अभय कुमार, बोधगया
11. Mr. Christian Eliasson, Sweden
12. Ms. Zahra Sheikh, Qatar

## ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबईमध्ये

### 1. एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रमः

**1. रविवार 19** जानेवारी 2025 ला सयाजी ऊ बा खिन यांची पुण्य-तिथि (19-1-1971) व माताजींच्या पुण्य-तिथि (5 जानेवारी 2016) च्या निमित्ताने **एक दिवसीय** महाशिबिर होतील.

**Email:** *oneday@globalpagoda.org* **Online registration:** *http://oneday.globalpagoda.org/register*

### 2. एक दिवसीय शिबिर दररोज

या व्यतिरिक्त विपश्यना साधकांसाठी पगोडा मध्ये दररोज एक दिवसीय शिबिर आयोजित केली जात आहे. कृपया सामील होण्यासाठी खालील लिंक चा उपयोग करावा. आणि एक मोठ्या सामूहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. *समग्गानं तपोसुखो।* **संपर्क: 022 50427500 (Board Lines)** - Extn. no. 9, मो. **+91 8291894644.** (प्रतिदिन 11 से 5 बजे तक)

Online registration: http://oneday.globalpagoda.org/register; **Email:- guruji.centenary@globalpagoda.org or** Email: oneday@globalpagoda.org

### 'धम्मालय' विश्राम गृह

एक दिवसीय महाशिबिरासाठी आल्यावर रात्री **'धम्मालय'** मध्ये विश्रातीसाठी सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी आणि (बुकिंग) नोंदणीसाठी **संपर्क:** 022 50427599 or email- *info.dhammalaya@globalpagoda.org or info@globalpagoda.org*

## मंगल मृत्यु

1. नांदेड (महाराष्ट्र) येथील वरिष्ठ सहाय्यक आचार्य श्री रविकुमार मेडी यांनी दिनांक ४ सप्टेंबर २०२४ ला शांतीपूर्वक शरीराचा त्याग केला. धर्माच्या प्रती अतूट आस्था, समर्पण, सेवाभाव आणि कठीण परिश्रम यामुळे त्यांनी अनेकांना प्रेरित केले व आकर्षित केले. त्यांनी नांदेड, औरंगाबाद आणि पटना केंद्रावर दीर्घकाळ राहून सेवा दिली आणि अनेकांच्या कल्याणात सहाय्यक ठरले. त्यांचे धर्मपूर्ण नियंत्रित जीवन इतरांसाठी एक उदाहरण सिद्ध झाले. धर्ममय जीवन जगून त्यांनी जी सेवा केली ती आम्हां सर्वांसाठी प्रेरणाजनक आहे. धर्मपथावर त्यांची उत्तरोत्तर प्रगती होत राहो आणि ते निर्वाणलाभी होवोत!
2. समन्वयक क्षेत्रीय आचार्या (विदर्भ क्षेत्र) नागपूरच्या श्रीमती नलिनी दाहट यांनी दिनांक 16 सप्टेंबर 2024 ला आपल्या निवासस्थानी शांतीपूर्वक समतापूर्ण चित्ताने शेवटचा श्वास घेतला. 1994 मध्ये सहाय्यक आचार्य रूपाने आपल्या धर्मसेवेचा प्रारंभ केला आणि उत्तरोत्तर वरिष्ठ आचार्य तसेच आचार्यांच्या रूपाने धम्मसेवा करीत विदर्भाच्या संपूर्ण क्षेत्रामध्ये धर्माच्या प्रचार-प्रसारात मोठे योगदान दिले. विदर्भ क्षेत्रात जिप्सी शिबिरांचे आयोजन व प्रचार-प्रसारात त्यांचे खूप महत्वपूर्ण योगदान होते. त्या धर्म मार्गावर उत्तरोत्तर अग्रसर होत राहोत, हीच मंगल कामना आहे.

### दोहे धर्माचे

पंचशील पालन करा, द्या मनपूर्वक दान।<br>
करा साधना भावना, अनमोल धर्म च जाण॥<br>
पुण्य कर्म संचित करा, नको पाप लवलेश।<br>
मन निर्मळ करीत रहा, हाच धर्म संदेश॥<br>
आई-वडिलांना नमन, गुरुजनांचा सत्कार।<br>
समता च असे मित्रांशी, पत्नीशी प्रेम अपार॥<br>
कुटुंबाचे पालन करा, करा दान उन्मुक्त।<br>
सदा च ऋण मुक्त रहा, भेटे सुख उपयुक्त॥

### दोहे धर्माचे

चित्त प्रमोदित होई, परहित, दिले च दान।<br>
मोदाच्या च बीजाने, सुख निपजे रे जाण॥<br>
समज धर्माच्या मर्माला, देणे म्हणजे दान।<br>
दान करी रे मन मृदू, हे मन सुखाची खाण॥<br>
सुमनाने दान द्यावे, सुमन सुखी रे होय।<br>
दुषित मन करता त्वरित, सुख आपलेच खोय।<br>
दान दिले आणि मूर्खा, दवंडी रे पिटवे।<br>
दान दिले यश स्वतःच, विन बोलविता यावे॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादकः राम प्रताप यादव, धम्मगिरी, इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2568, आश्विन पौर्णिमा, 17 ऑक्टोबर, 2024 वर्ष 8 अंक 7

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK 286/2024-2026

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**
**DATE OF PRINTING: 02 OCTOBER, 2024, DATE OF PUBLICATION: 17 OCTOBER, 2024**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244998, 243553, 244076, 244086, 244144, 244440
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org